# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १७९** **दिनांक ०३/०७/२०२१**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरिता स्तर-३ (Level-3) चे सर्व निर्बंध जसेच्या तसे लागू- पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) यांचे सिआरपीसी कलम १४४ प्रमाणे आदेश.**

कोरोना विषाणूच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने नोटीफिकेशन क्रं. डीएमयु/२०२०/सीआर ९२/ आपत्ती व्यवस्थापन -१ दिनांक ०४/०६/२०२१ अन्वये आदेश लागु केलेला असून कोरोना विषाणु संसर्गाचा कमी झालेला प्रादुर्भाव लक्षात घेता राज्यात यापुर्वी लागु केलेल्या मनाई आदेशातील निबंधांमध्ये शिथिलता दिली आहे.

सदर आदेशास अनुसरुन श्री विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये दिनांक २८/०६/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वाजे पासुन दिनांक ०५/०७/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वाजे पावेतो मनाई आदेश लागू केलेले होते. शासनाने निर्गमित केलेल्या उपरोक्त आदेशास अधिन राहुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कोविड संसर्गास तात्काळ प्रतिबंधक उपाय योजना म्हणुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक १८/०६/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या मनाई आदेशामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे Levels of Restrictions For breaking The Chain अंतर्गत स्तर-३ (Level-3) मध्ये समाविष्ट असल्याने या स्तराचे सर्व निर्बंध दिनांक ०४/०६/२०२१ रोजीचे शासन आदेशानुसार जसेच्या तसे लागू राहतील.

सदरचा मनाई आदेश हा दिनांक ०५/०७/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वाजे पासून दिनांक १२/०७/२०२१ रोजीच्या सकाळी ०७.०० वाजे पावेतो मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयातील मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दी करीता लागू राहतील.

-----oooo-----